# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

**(सायंकाळ)**

**दिनांक २०.०८.२०२६ गुरूवार**

**(कामगिरी)**

**गणेशपेठ पोलीसांची कामगिरी :— एम.डी. पावडर बाळगणाऱ्या आरोपीस अटक.**

दिनांक २०.०८.२०२६ चे ०४.२५ वा. ते ०५.४० वा. चे दरम्यान, गणेशपेठ पोलीसांचे तपास पथकातील अधिकारी व अंमलदार हे पेट्रोलींग करीत असताना, त्यांना खात्रीशीर माहिती मिळाली की, कॉटन मार्केट येथील कल्पना वाईन शॉपमागे एक अमोल नावाचा ईसम ई—रिक्षाने एम.डी. पावडर विक्रीकरीता येणार आहे. अशा माहीतीवरून नमुद ठिकाणी सापळा रचुन मिळालेल्या वर्णनाचा ईसम मालवाहक ई—रिक्षा क्र. एम.एच. ४९ ए.आर.७७११ ने आला असता, त्यास सापळा रचुन ताब्यात घेतले. पंचासमक्ष त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव अमोल भाऊराव गायकवाड, वय ३५ वर्षे, रा. चिलना पाचगांव, तह. कुही, जि. नागपूर असे सांगीतले. त्याचेजवळ अंमली पदार्थ असल्याचे दाट संशयावरून, एनडीपीएस कायद्याचे तंतोतंत पालन करुन, त्याची अंगझडती घेतली असता, त्याने घातलेल्या शर्टाचे आस्तीनमध्ये दोन झिपलॉक पन्नीत एकुण ५.४१ ग्रॅम एम.डी. पावडर मिळुन आली. आरोपीचे ताब्यातुन एम.डी. पावडर, ०१ मोबाईल व ई—रिक्षा असा एकुण १,०६,२३०/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपी हा स्वत:चे आर्थिक फायद्याकरीता एम.डी. पावडर विक्री करण्याकरीता बाळगतांना समक्ष मिळुन आला. आरोपीचे कृत्य हे कलम ८(क),२१(ब),२९ एन.डी.पी.एस. ॲक्ट नुसार होत असल्याने, आरोपीविरूध्द पोलीस ठाणे गणेशपेठ येथे गुन्हा नोंदविण्यात आलेला आहे. आरोपीस अटक करण्यात आली आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्रीमती विनीता शाहु, अपर पोलीस आयुक्त (उत्तर प्रभाग) नागपूर शहर, मा. श्री. राहुल मदने, पोलीस उप आयुक्त (परि.क्र. ३), मा. श्री. राजेश तटकरे सहा. पोलीस आयुक्त (कोतवाली विभाग) यांचे मार्गदर्शनाखाली, वपोनि. अतुल तावडे, दुपोनि. टिकाराम थाटकर, मसपोनि. संदीया सोमनकर, पोउपनि. अरूण पाटील, सफौ. समीर शेख, पोअं. राम, प्रकाश, सागर व वैभव यांनी केली.

**(गुन्हे)**

**१) पोलीस ठाणे कळमना :— शस्त्र बाळगुन धुमधाम करणाऱ्या आरोपीस अटक.**

दिनांक १९.०८.२०२६ चे १९.०० वा. चे सुमारास, कळमना पोलीसांचे तपास पथक हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, अनमोल पान पॅलेस जवळ, चिखली, मालधक्का रोड येथे आरडा—ओरड करून धुमधाम करणारा एक इसम पोलीसांना पाहुन पळु लागल्याने, त्याचा पाठलाग करून त्यास ताब्यात घेतले व त्याचे हातातील एक लोखंडी कोयत्यासारखा चाकु काढुन घेतला. पंचासमक्ष त्यास त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव शेख नासीर शेख हमीद, वय ३० वर्षे, रा. शितलामाता मंदीर जवळ, चिखली झोपडपट्टी, कळमना, नागपूर असे सांगीतले. आरोपीचे ताब्यातुन एक लोखंडी कोयत्यासारखा चाकु किंमती ५००/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

आरोपी हा दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने चाकु बाळगुन धुमधाम करतांना समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, पोलीस ठाणे कळमना येथे आरोपीविरूध्द कलम ४,२५ भा.ह.का., सहकलम १३५ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**२) पोलीस ठाणे हुडकेश्वर :— घरफोडी करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.**

दिनांक १९.०८.२०२६ चे १४.०० वा. चे सुमारास, पोलीस ठाणे हुडकेश्वर हद्दीत यशनगर, साई मंदीरजवळ, पोतदार शाळेमागे, पाटील चे घरी किरायाने राहणाऱ्या फिर्यादी सौ. सुनिता अनुप वंजारी, वय ४० वर्षे ह्यांचे पती घराबाहेर व त्या राहते घराला कुलुप लावुन मुलांना कान्व्हेंटमधुन घेण्यास व तेथुन किराणा घेवुन मुलांना सोबत घेवुन २०.०० वा. चे सुमारास घरी परत आल्या असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीचे राहते घराचे मुख्य दाराचे कुलूप व कडी—कोंडा तोडुन, आंत प्रवेश करून, किचनरूम मधील आलमारीतील रोख १,००,०००/—रू. तसेच, सोन्याचे वेगवेगळे दागिने असा एकुण किंमती १,९०,००/—रू. चा मुद्देमाल चोरून नेल्याचे दिसुन आले.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे हुडकेश्वर येथे पोउपनि. प्रविण वाकडे यांनी अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०५(अ),३३१(३),३३१(४) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

**(अकस्मात मृत्यु)**

**१) पोलीस ठाणे गणेशपेठ :—** दिनांक २०.०८.२०२६ चे ०८.०० वा. चे सुमारास, पोलीस ठाणे गणेशपेठ हद्दीत लोधीपुरा, साई मंदीर जवळ, बजेरीया, गणेशपेठ येथे राहणारा लक्की रिंकु शाहु, वय ०३ वर्षे, हा त्याचे राहते घराचे दुसऱ्या माळ्याचे गॅलरीत खेळत असतांना, अचानक त्याचे संतुलन बिघडल्याने तो खाली पडल्याने गंभीर जखमी झाला. त्यास उपचाराकरीता मेयो हॉस्पीटल पिआयसियु येथे दाखल केले असता, उपचारादरम्यान डॉक्टरांनी १०.४० वा. तपासुन त्यास मृत घोषीत केले.

याप्रकरणी प्राप्त वैद्यकीय सुचनेवरून पोलीस ठाणे गणेशपेठ येथे मपोउपनि. नयना माहुलकर यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**२) पोलीस ठाणे सिताबर्डी :—** दिनांक २०.०८.२०२६ चे १२.०० वा. चे सुमारास, पोलीस ठाणे सिताबर्डी हद्दीत, मिठानिम दर्गाह जवळील फुटपाथवर एक अनोळखी पुरूष वय अंदाजे ६५ ते ७० वर्षे वयाचे बेशुध्द अवस्थेत मिळुन आल्याने, त्यांना उपचाराकरीता मेडीकल हॉस्पीटल येथे नेले असता, डॉक्टरांनी त्यांना तपासून मृत घोषीत केले. मृतकाची ओळख अद्याप पटलेली नाही. वर्णन— रंग गोरा, बांधा सडपातळ, चेहरा लांब, उंची ५ फुट ५ इंच, अंगात आकाशी रंगाचा टि—शर्ट व काळ्या रंगाचा फुलपॅन्ट घातलेला असुन, ओळख छातीवर तीळ आहे. नमुद मृतकास ओळखणाऱ्यांनी पोलीस ठाणे सिताबर्डी येथे संपर्क साधावा.

याप्रकरणी प्राप्त वैद्यकीय सुचनेवरून पोलीस ठाणे सिताबर्डी येथे पोउपनि. प्रविण डहाळे ९८५०९७९८५२ यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील चौकशी सुरू आहे.

**(मिसिंग)**

**पोलीस ठाणे अंबाझरी :—** कु. नैना उर्फ खुशबु मनोज नागरिकर वय १८ वर्षे रा. संजयनगर, पांढराबोडी, महेश किराणाजवळ, लक्ष्मण वडतकर यांचे घरी किरायाने, अंबाझरी, नागपूर ही दिनांक १८.०८.२०२६ चे ०२.३० वा. पासुन पोलीस ठाणे अंबाझरी हद्दीतुन, राहते घरी कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेली. घरी परत आली नाही. तिचा शोध घेतला असता मिळून आली नाही. **वर्णन** रंग—सावळा, चेहरा—गोल, बांधा—सडपातळ, उंची— ५ फुट ६ इंच, केस— काळे लांब, डोळे—काळे, अंगात— काळया रंगाची टिशर्ट व जिन्सपॅन्ट घातलेली आहे. भाषा— मराठी/हिंदी बोलते.



कु.नैना उर्फ खुशबु

**स्वा/—**

**( अंकुश राठोड )**
**पोलीस उप निरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**